“अ”, “ब” व “क” दर्जा प्राप्त दर्जेदार मराठी चित्रपटांना निर्मितीसाठी प्रोत्साहनपर अर्थसहाय्य मंजूरीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: मचिअ-२०२६/प्र.क्र.५२/सां.का.१.**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १६ मार्च, २०२६.**

**वाचा :** १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. मचिअ-२०१२/प्र.क्र.१४१/ सां.का.१, दि.३० ऑक्टोबर, २०१३
२) शासन शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक मचिअ-२०१२/ प्र.क्र.१४१/सां.का.१, दि.२८ ऑगस्ट, २०१४
३) शासन शुध्दीपत्रक,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक मचिअ-२०१२/ प्र.क्र.१४१/सां.का.१, दि.०८ ऑगस्ट, २०१८
४) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. गोचिन-२०२२/प्र.क्र.५८/ सां.का.१, दि.२५ जानेवारी, २०२३
५) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. गोचिन-२०२२/प्र.क्र.५८/ सां.का.१, दि.०३ मार्च, २०२३
६) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. मचिअ-२०२४/प्र.क्र.८९/ सां.का.१, दि.२५ सप्टेंबर, २०२४
७) शासन शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. मचिअ- २०२४/प्र.क्र.८९/ सां.का.१, दि.०७ ऑक्टोबर, २०२४
८) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, गोरेगाव, मुंबई यांचे दि.०२ मार्च, २०२६ चे पत्र.

**प्रस्तावना :**

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याकरीता अर्थसहाय्य करण्यासाठी उपर्निर्दिष्ट १ अन्वये धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर चित्रपटांची पात्रता तपासण्यासाठी संदर्भ क्र. ४ व ५ येथील शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.८ येथील प्रस्तावानुसार गठीत समितीमार्फत छाननीअंती पात्र ठरलेल्या २० चित्रपटांना रु.५८०.०० लक्ष, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त १ चित्रपटासाठी रु.७९.०० लक्ष व महिला दिग्दर्शिका यांना रु.५.०० लक्ष असे एकूण रुपये ६६४.०० लक्ष अनुदान देण्याच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :**

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन योजनेंतर्गत उपनिर्दिष्ट १ ते ३ व ६ मधील शासन निर्णयात नमूद तरतूदीनुसार गठीत समितीमार्फत छाननीअंती पात्र ठरलेल्या खालील २० चित्रपटांना रु.५८०.०० लक्ष, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त १ चित्रपटासाठी रु.७९.०० लक्ष व महिला दिग्दर्शिका यांना रु.५.०० लक्ष असे एकूण **रुपये ६६४.०० लक्ष (अक्षरी रुपये सहा कोटी चौसष्ट लक्ष फक्त)** इतक्या रकमेस या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

**अ) परीक्षण समितीमार्फत छाननीअंती पात्र चित्रपट :-**

(रु.लक्ष)

| अ. क्र. | चित्रपटाचे नांव | चित्रपट निर्मिती संस्थेचे नाव | दर्जा | प्रत्यक्षात देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | छबिला | मे.लोरा फिल्मस | अ | ३९.०० |
| २ | कुर्ला टू वेगूर्ला | मे. सिन कथा किर्तन | अ | ३९.०० |
| ३ | पुन्हा एकदा चौरंग | मे. आरोही फिल्मस् | अ | ३९.०० |
| ४ | गुलाबी | मे.व्हायलेट फ्लेम मोशन पिक्चर्स् एल.एल.पी | अ | ३९.०० |
| ५ | इलू इलू - १९९८ | मे.फाळके फिल्मस एंटरटेनमेंट | अ | ३९.०० |
| ६ | घरत गणपती | मे. नॉविअन्स स्टुडिओ प्रा.लि. | अ | ३९.०० |
| ७ | स्वरगंधर्व सुधीर फडके | मे.रेड लाईन प्रोडक्शन एल.एल.पी | अ | ३९.०० |
| ८ | गिराण | मे.मोहित फिल्मस बारामती | अ | ३९.०० |
| ९ | आशा | मे.ओंजल आर्ट प्रोडक्शन | अ | ३९.०० |
| १० | केसरी | मे.भावना फिल्मस एल.एल.पी. | अ | ३९.०० |
| ११ | बाई गं | मे.ए.बी.सी.क्रिएशन्स | ब | २९.०० |
| १२ | ८ दोन ७५ फक्त इच्छाशक्ती हवी | मे.उदाहरणार्थ निर्मिती | ब | २९.०० |
| १३ | डंका हरी नामाचा | मे.रूद्र एंटरटेनमेंट | ब | २९.०० |
| १४ | मंगला | मे.रश् प्रोडक्शन प्रा.लि. | ब | २९.०० |
| १५ | काळीमाती | मे.एम.एच.जी एंटरटेनमेंट | ब | २९.०० |
| १६ | बांबू | मे.क्रिएटिव्ह वाईब प्रोडक्शान्स | क | ९.०० |
| १७ | झिंजाय | मे.दिप सिम्फोनिज | क | ९.०० |
| १८ | एक डाव भुताचा | मे.रेवा इलेक्ट्रॉनिक | क | ९.०० |
| १९ | प्रतिष्ठा | मे.मारूती एंटरप्रायझेस | क | ९.०० |
| २० | फ्रेन्डशिप डॉटकॉम | मे.श्री व्हीजन ड्रीम्स फॅक्ट्री | क | ९.०० |
| | | | एकूण | ५८०.०० |

**ब) राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपट ("अ" दर्जा) :-**

(रु.लक्ष)

| अ. क्र. | चित्रपटाचे नांव | चित्रपट निर्मिती संस्थेचे नाव | प्राप्त | पुरस्कार वर्ष/ प्रदान वर्ष | दर्जा | मंजूर अर्थसहाय्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्यामची आई | पुणे फिल्मस कंपनी प्रा.लि. | पुरस्कार वर्ष -२०२३ प्रदान वर्ष-२०२५ | ०५.१०.२०२५ | अ | ७९.०० |
| | | | | | **एकूण** | **७९.००** |

७१ व्या राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त “श्यामची आई” या चित्रपटाचे चित्रीकरण, गोरेगाव चित्रनगरी, मुंबई व कोल्हापूर चित्रनगरी, कोल्हापूर येथे न झाल्यामुळे अनुदानाच्या रक्कमेमधून रु.१.०० लक्ष एवढी रक्कम कपात करुन प्रत्यक्षात देय रक्कम रकाना क्र.६ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**क) महिला दिग्दर्शिका अर्थसहाय्य :-**

(रु.लक्ष)

| अ. क्र. | चित्रपटाचे नांव | दिग्दर्शिकेचे नाव | परिक्षण दिनांक | दर्जा | मंजूर अर्थसहाय्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मंगला | श्रीमती.अपर्णा होशींग | ११-१०-२०२५ | ब | ५.०० |
| | | | | **एकूण** | **५.००** |

**०२.** यासाठी होणारा खर्च “मागणी क्र.झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती कार्यक्रम, (००) १०२, कला संस्कृती प्रचालन, (०३) (०७) मराठी चित्रपट निर्मितीसाठी सहायक अनुदान (२२०५ १५९९) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा.

**०३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०३१६१८२१४००७२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUMANT DINKAR PASHTE

Digitally signed by SUMANT DINKAR PASHTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS, 2.5.4.20=58694D4CD2BD16F0AB6514FC8598A9AA217E2508455856A701ADB1BB6EF9B120, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AFC006DAAE95D0F2CF7C7F09CA18CF0C9C9363A05E6070B1C03455CF1CB43586, cn=SUMANT DINKAR PASHTE
Date: 2026.03.16 18:22:37 +05'30'

**(सुमंत दि.पाष्टे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-एक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरीक्षा)-एक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
८. नियोजन विभाग (का.१४४३), मंत्रालय, मुंबई
९. वित्त विभाग (व्यय-१५, अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई
१०. अवर सचिव (रोख शाखा), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवड नस्ती- सां.का.१.